**Happy New Year 2025**

To,

Police Officers

**Sub:** "Grounds of Arrest" and "Reasons for Arrest"

Take note that as per Art. 22(1) of Constitution of India, and Section 47(1)(2) of Bhartiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 it is incumbent upon investigating officer to inform the accused "Grounds of Arrest" at the time of arresting the Accused in an offence. The Law laid down by the Hon'ble Supreme Court in the matter of Pankaj Bansal Vs. Union of India & Ors.[1] expressed its necessity and Hon'ble supreme Court in the matter of Prabir Purkayastha Vs. State (NCT of Delhi)[2] further reiterated the same and further clarified the difference between "Reasons for Arrest" and "Grounds of Arrest". The Hon'ble High Court in the matter of Mahesh Pandurang Naik vs State of Maharashtra And Anr.[3] issued similar directions and called upon the Director General of Police (DGP) to circulate the said Judgment to all police officers for ensuring compliance of said directions given by Hon'ble Supreme Court.

**मराठी अनुवाद**

प्रती

पोलिस अधिकारी

**विषय:** अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे ("ग्राऊंडस ऑफ अरेस्ट") आणि अटकेची कारणे ("रीझन्स फॉर अरेस्ट")

भारतीय घटनेचा अनुच्छेद २२(१) आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चा कलम ४७(१)(२) नुसार, एखाद्या गुन्ह्यात आरोपीस अटक करताना तपासी अधिकारी यांनी आरोपिस "अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे" ("ग्राऊंडस ऑफ अरेस्ट") कळविणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी. मा. सर्वोच्च न्यायालयाने पंकज बंसल वि. भारत सरकार v इतर[1] या प्रकरणांमध्ये या न्यायिक तत्वाची आवश्यकता अधोरेखीत केलेली आहे आणि मा. सर्वोच्च न्यायालयाने, परबीर पुरकयास्था वि. सरकार (एनसीटी ऑफ दिल्ली)[2] या प्रकरणात याचा पुनरोल्लेख केलेला आहे. आणि अटकेची कारणे "रीझन्स फॉर अरेस्ट" आणि अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे "ग्राऊंडस ऑफ अरेस्ट" या मधील फरक स्पष्ट केलेला आहे. मे. मुंबई उच्च न्यायालयाने महेश पांडुरंग नाईक वि महाराष्ट्र सरकार व इतर[3] या प्रकरणातसुध्दा तसेच आदेश दिलेले असून, पोलिस महासंचालक यांनी सदर न्यायानिर्णय सर्व पोलिस अधिकारी यांना पाठवून माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन सुनिश्चित करावे असे निर्देश दिलेले आहेत.

****************************************************************************

**This note is circulated only for information and all concern are requested to exercise due care and make use of the same with full application of mind viz – a – viz facts of the respective case.**

**Adv. Shreekant V. Gavand, Addl. Govt. Pleader & Addl. Public Prosecutor, High Court, A.S. Bombay**

| | |
|---|---|
| Hon'ble Supreme Court, in the matter of <u>Prabir Purkayastha Vs. State (NCT of Delhi)</u>[2] made following observation in para 49 of the judgment, :<br>49. It may be reiterated at the cost of repetition that there is a significant difference in the phrase 'reasons for arrest' and 'grounds of arrest'. The 'reasons for arrest' as indicated in the arrest memo are purely formal parameters, viz., to prevent the accused person from committing any further offence; for proper investigation of the offence; to prevent the accused person from causing the evidence of the offence to disappear or tempering with such evidence in any manner; to prevent the arrested person for making inducement, threat or promise to any person acquainted with the facts of the case so as to dissuade him from disclosing such facts to the Court or to the Investigating Officer. These reasons would commonly apply to any person arrested on charge of a crime whereas the 'grounds of arrest' would be required to contain all such details in hand of the Investigating Officer which necessitated the arrest of the | माननीय सर्वोच्च न्यायालयाने <u>परबीर पुरकयास्था वि. सरकार (एनसीटी ऑफ दिल्ली)</u>[2] या प्रकरणात दिलेल्या निकालाचे परिच्छेद ४९ मध्ये खालील निरीक्षण नोंदविलेले आहे<br>४९. जरी पुनरावृत्ती होत असली तरी हे परत नमूद केले पाहीजे की, अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे (ग्राऊंडस ऑफ अरेस्ट) आणि अटकेची कारणे (रीझन्स फॉर अरेस्ट) या संज्ञामध्ये लक्षणीय फरक आहे. अटक मेमो मध्ये नमूद करण्यात आलेली अटकेची कारणे (रीझन्स फॉर अरेस्ट) या पूर्णपणे औपचारिक निकष आहेत. उदा. आरोपीस पुढील गुन्हा करण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी, अपराधाचे योग्य प्रकारे अन्वेषण करण्यासाठी, आरोपीस गुन्हयातील पुरावा नाहीसा करण्यापासून किंवा पुराव्यामध्ये कोणत्याही प्रकारे फेरफार करण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी, ज्या व्यक्तीकडे या घटनेच्या बाबत काही माहीती आहे, अशा व्यक्तीस, या गुन्हयाची वस्तुस्थिती न्यायालयाकडे अथवा पोलिसांकडे उघड करण्यापासून, परावृत्त करण्याकरीता अटक केलेल्या व्यक्तीने कोणत्याही प्रकारे प्रलोभन, धमकी किंवा अभिवचन देण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी. ही कारणे सामान्यतः गुन्हयाच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला लागू होतील तथापी अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे (ग्राऊंडस ऑफ अरेस्ट) यामध्ये तपासी अधिकाऱ्याच्या हातात असलेला सर्व तपशील नमूद करणे आवश्यक आहे ज्यामुळे आरोपीला अटक करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर लेखी स्वरूपात देण्यात येणारे अटक करण्यासाठी |

| | |
|---|---|
| accused. Simultaneously, the grounds of arrest informed in writing must convey to the arrested accused all basic facts on which he was being arrested so as to provide him an opportunity of defending himself against custodial remand and to seek bail. Thus, the 'grounds of arrest' would invariably be personal to the accused and cannot be equated with the 'reasons of arrest' which are general in nature. | आधारभूत मुद्दे (ग्राऊंडस ऑफ अरेस्ट), याद्वारे अटक करण्यात आलेल्या आरोपीला त्याला का अटक करण्यात आली आहे याबाबत सर्व मूलभूत तथ्ये सांगणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यास कोठडी रिमांडपासून स्वतःचा बचाव करणे आणि जामीन मागणे या करीता संधी प्राप्त होईल. अशाप्रकारे, अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे (ग्राऊंडस ऑफ अरेस्ट) ही नेहमीच आरोपीसाठी वैयक्तिक असतील आणि त्याची तुलना सामान्य स्वरूपातील अटकेची कारणे (रीझन्स फॉर अरेस्ट) यांच्याशी करता येणार नाही. |
| It has been noticed in number of cases, that there is lot of confusion regarding "Grounds of Arrest and "Reasons for Arrest" and therefore in for want of communication of grounds of arrest in the manner as required by law, the arrest of the accused is declared as illegal and accused is released by Hon'ble Court and it adversely affects the investigation of the offence and grave prejudice is caused to the prosecution. | बहुतांश प्रकरणांमध्ये असे निदर्शनात आले आहे की अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे (ग्राऊंडस ऑफ अरेस्ट) आणि अटकेची कारणे (रीझन्स फॉर अरेस्ट) याबाबत मोठ्या प्रमाणात संभ्रम आहे. त्यामुळे अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे (ग्राऊंडस ऑफ अरेस्ट) हे आरोपीस कायद्यास अभिप्रेत असल्यानुसार न कळविल्यामुळे, आरोपीची अटक बेकायदेशीर ठरविण्यात येते आणि मा. न्यायालयाकडून आरोपिस सोडून देण्यात येते. या गोष्टीचा गुन्हयाच्या तपासावर विपरित परिणाम होतो आणि खटल्यावर त्याचा गंभीर दुष्परिणाम होतो. |
| The below mentioned format is an attempt to explain the exercise to be undertaken by investigating officer while arrested the accused so as to comply with the requirement of law and the directions given by the Hon'ble High Courts. | सोबत जोडलेला प्रारूप नमूना, हा तपासी अधिकाऱ्याने आरोपीस अटक करताना कोणती खबरदारी घ्यावी हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे, जेणेकरून कायदेशीर तरतूद आणि आणि वरिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन केले जाईल. |

*****************************************************************************
**This note is circulated only for information and all concern are requested to exercise due care and make use of the same with full application of mind viz – a – viz facts of the respective case.**
**Adv. Shreekant V. Gavand, Addl. Govt. Pleader & Addl. Public Prosecutor, High Court, A.S. Bombay**

The consequential changes would be necessary in grounds in the said intimation format, with reference to the facts of the respective case.

So also, the Hon'ble Supreme Court in the matter of Youth Bar Association vs Union of India [4], held that the accused is entitled to get the copy of FIR. Sometimes the FIR is not uploaded on CCTNS and the accused makes grievance regarding non receipt of FIR. BNSS 47(1) make it mandatory to give accused full particulars of the offence for which he is arrested and therefore it would be better to annex copy of FIR to the said notice given to the accused intimating him grounds of arrest.

**Shreekant Vitthalrao Gavand**
**Addl. Govt. Pleader &**
**Addl. Public Prosecutor**
**20/12/2024**

प्रत्येक केसाच्या तथ्यानुसार / घटनेनुसार त्या प्रारूप सुचनापत्रामधील मुद्यांमध्ये आवश्यक बदल करणे आवश्यक आहे.

त्याच प्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने युथ बार असोसिएशन वि. भारत सरकार [4] या प्रकरणात असे निर्देशित केले आहे की आरोपी फिर्यादीची प्रत मिळण्यास पात्र आहे. काही वेळेस फिर्यादीची परत सीसीटीएनएस वर अपलोड केली जात नाही आणि आरोपी फिर्यादीची प्रत प्राप्त न झाल्याची तक्रार करतात. भा.ना.सु.सं. कलम ४७(१) नुसार आरोपीस त्यास अटक केल्या जाणाऱ्या गुन्ह्याचा पूर्ण तपशील देणे बंधनकारक आहे आणि त्यामुळे आरोपीस अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे ("ग्राऊंडस ऑफ अरेस्ट") देताना, दिल्या जाणाऱ्या सुचनेसोबत फिर्यादीची प्रत सोबत जोडली तर योग्य ठरेल.

**श्रीकांत विठ्ठलराव गावंड**
**अति. सरकारी वकील आणि**
**अति. शासकीय अभियोक्ता**
**२०/१२/२०२४**

1. Pankaj Bansal Vs. Union of India & Others - 2023 SCC Online SC 1244 – Decision Dt.: 03/10/2023
2. Prabir Purkayastha Vs. State (NCT of Delhi) - (2024) SCC Online SC 934 - Decision Dt.: 15/5/2024
3. *Mahesh Naik* Vs.*State of Maharashtra (WPST/13835/2024)* Decision Dt.: 18/7/2024
4. Youth Bar Association of India Vs. Union of India & Others - 2016 (3) SCC(Cri) 691 - Decision Dt.: 7/9/2016

**सोबत : भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम ४७(१)(२) अन्वये सुचनापत्राचा नमूना**

*******************************************************************************
**This note is circulated only for information and all concern are requested to exercise due care and make use of the same with full application of mind viz – a – viz facts of the respective case.**
**Adv. Shreekant V. Gavand, Addl. Govt. Pleader & Addl. Public Prosecutor, High Court, A.S. Bombay**

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम ४७(१)(२) अन्वये**

# सुचनापत्र

जावक क्र. - / २०२
_____________ पोलिस स्टेशन
ता. _________, जिल्हा ________
**दिनांक : / / २०२**

प्रती,
(आरोपीचे नाव व पत्ता )
___________________
___________________

**विषय :** ________पोलिस स्टेशन गुन्हा रजि. क्र. ____ / _____ कलम _____________भा. न्या. सं., _________, नुसार दाखल असलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने आरोपिस अटक करताना अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे आणि अटकेची कारणे कळविणेबाबत

आपणास या सुचनापत्राद्वारे कळविण्यात येते की, आपल्या विरुध्द ______ पोलिस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. ____ / _____ कलम _________________भा. न्या. सं., _________, नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, मी तपासी अधिकारी म्हणून सदर गुन्ह्याचा तपास करीत आहे. सदर गुन्ह्याचे तपासकामी आपणास अटक करणे गरजेचे असून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम ४७(१)(२) नुसार आपणास अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे आणि अटकेची कारणे कळविण्यात येत आहे.

**गुन्ह्याचे संक्षिप्त विवरण :** ________________________________________
____________________________________________________________
____________________________________________________________
____________________________________________________________
____________________________________________________________
____________________________________________________________

(अधिक माहितीसाठी फिर्यादीची प्रत सोबत जोडली आहे)

*******************************************************************************
This note is circulated only for information and all concern are requested to exercise due care and make use of the same with full application of mind viz – a – viz facts of the respective case.
Adv. Shreekant V. Gavand, Addl. Govt. Pleader & Addl. Public Prosecutor, High Court, A.S. Bombay

# अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे (GROUNDS OF ARREST)

(सदर मुद्दे घटनेच्या अनुषंगाने **संबंधीत आरोपी विरुध्द प्राप्त** झालेले पुरावे यांचे अनुषंगाने असणे गरजेचे आहे. खाली नमूद केलेले मुद्दे हे सर्वसाधारणपणे अंदाजे नमूद केलेले असून, गुन्ह्याची घटना आणि उपलब्ध पुरावा यानुसार त्यात बदल करावा आणि जे मुद्दे लागू होणार नाहीत ते वगळावे - आवश्यकतेनुसार जे वेगळे मुद्दे संबंधीत आरोपीस त्यास अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे म्हणून आवश्यक असतील त्याचा अंतर्भाव करावा)

१) नमूद गुन्ह्याचे फिर्यादीमध्ये आपले नाव नमूद केलेले असून, तपासादरम्यान प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी सुध्दा आपल्या गुन्ह्यातील सहभागाबाबत नमूद केले आहे. / गुन्ह्यातील साक्षीदारांना आपण प्रलोभन दाखवून त्यांची फसवणूक केलेली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. **(आणि / किंवा)**

२) सदर गुन्ह्यात आपण उपस्थित राहून गुन्हा करताना सहभाग घेतल्याचे, तपासात साक्षीदार यांचे नोंदविलेल्या जवाबावरून स्पष्ट होते. **(आणि / किंवा)**

३) झाल्या तपासावरून हा गुन्हा संगनमताने कट करून केल्याचे स्पष्ट असून आपण कटामध्ये सहभागी असल्याचा पुरावा निष्पन्न झाला आहे. **(आणि / किंवा)**

४) घटनास्थळी असलेल्या सीसीटीव्ही फुटेज वरुन **/** मोबाईल सी.डी.आर. नुसार **/** बँकेतील आर्थिक व्यवहारानुसार- आपला गुन्ह्यात सहभाग स्पष्ट होतो **(आणि / किंवा)**

५) आपण सदर गुन्हा पोलिसांच्या उपस्थितीत केलेला आहे. **(आणि / किंवा)**

६) आपण नमूद गुन्ह्यात सहभागी असल्याबाबत विश्वसनीय माहिती मिळालेली असून आपण गुन्हा केल्याबद्दल वाजवी संशय आहे **(आणि / किंवा)**

७) नमूद गुन्ह्याचे अनुषंगाने चोरीची संपत्ती म्हणून वाजवी संशय घेता येईल अशी ________ वस्तू आपल्या कब्जात असून अशा ______वस्तुसंबंधात आपण अपराध केला असल्याचा वाजवी संशय आहे. **(आणि / किंवा)**

८) गुन्हा केल्यानंतर आपणास घटनास्थळावर रंगेहात पकडण्यात आले / आपणास घटनास्थळी उपस्थित साक्षीदारनी आपणास पकडून ठेवले / मिळालेल्या महितीनुसार गुन्ह्यासंबंधी ________ हा मुद्देमाल आपणांकडे मिळून आलेला असून त्यावरुन आपला गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट झाला आहे. **(आणि / किंवा)**

९) आपण सदर गुन्हा करताना ________या शस्त्राचा वापर केलेला असून, सदर शस्त्र हस्तगत करण्यासाठी आपली चौकशी करणे गरजेचे आहे / आपण या गुन्ह्यात रक्कम रुपये ------- या रक्कमेचा अपहार केलेला असून सदर रक्कम आपणाकडून हस्तगत करणे गरजेचे आहे. **(आणि / किंवा)**

१०) आपल्या ताब्यात बेकायदेशीर शस्त्र मिळून आले असून / आपण संशयास्पद अवस्थेत मिळून आला असून त्यावरून आपण जबरी चोरी / दरोडा घालण्याचे तयारीत असल्याचे दिसून येते **(आणि / किंवा)**

११) झालेल्या गुन्हयात आपल्यासोबत इतर आरोपी सहभागी होते का? याबाबत चौकशी करून सहभागी असणारे इतर आरोपी निष्पन्न करण्याकरीता आपणास अटक करून चौकशी करणे गरजेचे आहे. **(आणि / किंवा)**

१२) केलेल्या तपासावरून आपला सदर गुन्ह्यामध्ये प्रत्यक्ष सहभाग असल्याचे दिसून येत आहे. **(आणि / किंवा)**

१३) .. .. .. .. (अशा प्रकारचे उपलब्ध पुराव्यांच्या आधारे संबंधीत आरोपीस लागू होणारे आधारभूत मुद्दे

**(अटक करण्यासाठी आधारभूत मुद्दे नमूद करताना आपल्या सदसद्विवेकबुध्दीचा वापर करावा केवळ कॉपी पेस्ट करू नये)**

## अटकेची कारणे (REASONS FOR ARREST)

१) आपल्याकडून अशा प्रकारचा कोणताही गुन्हा करण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी

२) अपराधाचे योग्य प्रकारे अन्वेषण करण्यासाठी

३) आपणास गुन्हयातील पुरावा नाहीसा करण्यापासून आणि पुराव्यामध्ये कोणत्याही प्रकारे फेरफार करण्यापासून आपणास प्रतिबंध करण्यासाठी

४) ज्या व्यक्तीकडे या घटनेच्या बाबत काही माहीती आहे, अशा व्यक्तीस, या गुन्ह्याची वस्तुस्थिती न्यायालयाकडे अथवा पोलिसांकडे उघड करण्यापासून परावृत्त करण्यासाठी आपण कोणत्याही प्रकारे प्रलोभन, धमकी किंवा अभिवचन देण्यापासून आपणास प्रतिबंध करण्यासाठी

५) आपणास अटक केल्याखेरीज, ज्या वेळी गरज असेल त्यावेळी आपण न्यायालयात उपस्थित राहाल याची खात्री देता येत नाही

६) सदर गुन्हा गंभीर स्वरूपाचा आहे.

आपणास असे ही कळविण्यात येते की नमूद गुन्हा हा दखलपात्र असून अजामीनपात्र आहे आणि त्यामुळे आपण या गुन्हयात न्यायालयात जामीनाचा अर्ज सादर करून, न्यायालयाचे आदेशाने जामीनावर मुक्त होवू शकता.

आपल्या अटकेची माहीती आपले नातेवाईक / मित्र ____________________ रा. __________________________ यांना लेखी सुचनेने / फोन क्र. _______ या वर संपर्क करून देण्यात आलेली आहे देण्यात आलेली आहे.

या करीता आपणास सुचनापत्र देण्यात येत आहे

| | |
|---|---|
| **मला सूचनापत्र प्राप्त झाले** | **सही/-** |
| **सही/-** | **____________ पोलिस निरीक्षक** |
| **(आरोपीचे नाव ______________)** | **_______________ पोलिस स्टेशन** |
| **दिनांक : _________________** | **ता. __________, जिल्हा ______** |

*****************************************************************************

**This note is circulated only for information and all concern are requested to exercise due care and make use of the same with full application of mind viz – a – viz facts of the respective case.**

Adv. Shreekant V. Gavand, Addl. Govt. Pleader & Addl. Public Prosecutor, High Court, A.S. Bombay